**WIRELESS MESSAGE** **P:OU**

**TO** : ALL POLCOMS IN M.S.
ALL RANGES SPL IGPs
ALL DISPOLS IN M.S.
ALL PRINCIPALS PTSs
ALL COMMANDANTs SRPF GROUPS

**FROM** : POLICE MUMBAI

**O.NO.DGP/XVII/6162/9AS-IMPLEMENTATION/2009, MUMBAI, DATED: 28-04-2009**

**TEXT** :

AS YOU ARE AWARE THAT WE ARE IN THE PROCESS OF IMPLEMENTING 9AS ACROSS THE STATE (.) THE STAFF ATTACHED TO DISTRICT/COMMISSIONERATE COMPUTER CELL (DCRB) AND THE COMPUTER STAFF ATTACHED TO SRPF GROUPS AND POLICE TRAINING SCHOOLS WHO ARE INVOLVED IN THE PREPARATION OF MASTER DATA OF 9AS OF YOUR RESPECTIVE UNITS SHOULD NOT BE TRANSFERRED ATLEAST FOR A PERIOD OF ONE YEAR TILL THE SMOOTH IMPLEMENTATION OF 9AS ACROSS THE STATE (.) PRIORITY MOST URGENT (.)

S.Z. Khan 28/4/09

**FOR A.I.G.P.,(P&C)., M.S., MUMBAI**

Recd.
HWO 28/4/09

पोलीस बिनतारी दळणवळण संकुल
मुंबई

पोमस क्र /१७/६१६२/९ ए.एस./अंमलबजावणी चमू/२००९

महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय
Maharashtra Rajya Police Mukhyalaya
शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१
Shahid Bhagat Singh Marg, Colaba
Mumbai 400 001

दिनांकः- १३/०५/२००९

# परिपत्रक

**विषयः- ९ ए.एस. संगणक प्रणालीकरिता अंमलबजावणी चमू तयार करणेबाबत.**

महाराष्ट्र पोलीस दलाच्या आधुनिकीकरणाअंतर्गत सी.एम.सी. कंपनीमार्फत महाराष्ट्र पोलीस दलाकरीता ९ ए.एस.संगणक प्रणाली तयार करण्यात आलेली आहे. या सॉप-टवेअरचा उपयोग महाराष्ट्र पोलीस दलाच्या घटक कार्यालयांमधील प्रशासकीय कामकाजाकरिता होणार आहे. ९ ए.एस. संगणक प्रणालीमध्ये पुढील नमूद १० मोडयूल्सचा समावेश आहे. १.Law and Order २. Training and Recruitment ३. Financial Accounting and Cost Control ४. Vehicle/ Fleet Management ५. Traffic ६. Establishment ७. Purchase Supply Inventory Module ८. Integrated DJMS ९. Intelligence Collection १०.Administration.

९ ए.एस. संगणक प्रणालीचे काम पूर्ण झाले असून त्याची अंमलबजावणी महाराष्ट्रातील सर्व पोलीस घटकात लवकरच करावयाची आहे. या संगणकप्रणालीची अंमलबजावणी आपल्या घटक कार्यालयात यशस्वीरीत्या करण्याकरिता **अंमलबजावणी चमूची** अंत्यत आवशयकता आहे.त्या अनुषंगाने आपण आपल्या घटक कार्यालयात या संगणक प्रणालीची अंमलबजावणी करण्याकरिता **अंमलबजावणी चमू** तयार करावयाचा आहे.

- *अंमलबजावणी चमू तयार करताना खालील नमूद बाबी विचारात घेवून **कार्यकुशल व सक्षम मंत्रालयीन अधिकारी/कर्मचारी तसेच पोलीस अधिकारी/ अंमलदार** यांचा समावेश असलेल्या चमूची निर्मिती करण्याची जबाबदारी **घटक प्रमुखाची** असेल.*

१. ९ ए.एस.अंमलबजावणी चमूत **३ ते ४ अधिकारी / कर्मचा-यांचा** समावेश असेल व ९ ए.एस. संगणक प्रणालीकरिता आपल्याकडून नेमणूक केलेला **समन्वय अधिकारी** या चमूचा प्रमुख असेल.

२. अंमलबजावणी चमूतील अधिकारी / कर्मचारी हे **संगणकीय ज्ञानात पारंगत** असावेत, तसेच त्यांना आपल्या घटक कार्यालयात चालणा-या **प्रशासकीय कामकाजाची माहिती** असणे आवश्यक आहे.

३. अंमलबजावणी चमूतील अधिकारी / कर्मचारी हे **वयस्कर नसावेत** किंवा **सेवानिवृत्तीची वेळ** जवळ असलेले नसावेत.

आपल्या घटक कार्यालयाकरिता आपण निवडलेल्या **अंमलबजावणी चमूस** पोलीस महासंचालक कार्यालय येथे ९ ए.एस.संगणक प्रणालीबाबतचे **संपूर्ण प्रशिक्षण व मार्गदर्शन** देण्यात येवून, त्यांना या प्रणालीच्या वापराबाबत तसेच अंमलबजावणीबाबत **प्रशिक्षित व पारंगत** करण्यात येईल.

- **९ ए.एस. संगणक प्रणालीचे प्रशिक्षण घेतलेल्या अंमलबजावणी चमूवर खालील नमूद जबाबदा-या असतील.**

१. आपल्या घटक कार्यालयातील **सर्व कर्मचा-यांना** ९ ए.एस. संगणक प्रणालीचे प्रशिक्षण देणे.

२. ९ ए.एस. संगणक प्रणालीच्या कामाकाजावर देखरेख ठेवणे व तिची यशस्वीरीत्या अंमलबजावणी करणे.

३. अंमलबजावणीदरम्यान येणा-या अडचणी बाबत (हार्डवेअर/ सॉप-टवेअर/ लॅन कनेक्शन इत्यादीसंबंधी) आढावा घेवून त्याबाबतची माहिती आपल्या समन्वय अधिका-याच्या मार्फतीने पोलीस महासंचालक कार्यालयास कळविणे.

९ ए.एस संगणक प्रणालीच्या यशस्वी अंमलबजावणीची संपूर्ण जबाबदारी आपण निर्माण केलेल्या अंमलबजावणी चमूवर असेल त्याकरिता या चमूत **सक्षम व कार्यकुशल अधिकारी/कर्मचा-यांची निवड होणे अत्यंत आवश्यक आहे,** त्यानुसारच आपण या चमूची निर्मिती करावी.

९ ए.एस. संगणक प्रणालीसारख्या **महत्वाकांक्षी प्रकल्पाच्या** यशस्वी अंमलबजावणीकरिता **घटक प्रमुख,** त्यांनी तयार केलेला **अंमलबजावणी चमू** व **समन्वय अधिकारी** जबाबदार असतील.

(सही) १३/८/०८

**(सुभाष आवटे)**
o/c अपर पोलीस महासचालक (नि. व स.)
पोलीस महासचालक कार्यालय,मुंबई.

प्रति,

१. सर्व पोलीस आयुक्त, — १०
२. अपर पोलीस महासंचालक, रा.गु.अ.वि.पुणे. — १
३. संचालक, बिनतारी संदेश विभाग, पुणे. — १
४. संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक. — १
५. सर्व परीक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक — ८
६. विशेष पोलीस महानिरीक्षक, मोटर परिवहन विभाग, पुणे. — १
७. सर्व पोलीस अधिक्षक. — ३५
८. सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विदयालय. — ९
९. सर्व समादेशक, रा.रा.पो.बल. — १३

(78) ISSUED DATE 14/5/09 Signature